PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Tujhya Majhya Sansarala Aani Kay Hav

Year: 2008

Song: Gorya Gorya Galawari

Lyricist: Guru Thakur

गोऱ्या गोऱ्या गालावरी
चढली लाजेची लाली
गं पोरी नवरी आली
सनईच्या सुरामंधी
चौघडा बोलतो दारी
गं पोरी नवरी आली
सजणी मैत्रिणी जमल्या अंगणी
चढली तोरणं मांडव दारी
किण किण कांकणं
रूणुझुणु पैंजण
सजली नटली नवरी आली
गोऱ्या गोऱ्या गालावरी
चढली लाजेची लाली
गं पोरी नवरी आली
सनईच्या सुरामंधी
चौघडा बोलतो दारी
गं पोरी नवरी आली

हे... नवऱ्या मुलाची आली
हळद ही ओली
हो हळद ही ओली
लावा नवरीच्या गाली
हे हळदीनं नवरीचं अंग माखवा
हे पिवळी करून
तिला सासरी पाठवा
सजणी मैत्रिणी जमल्या अंगणी
चढली तोरणं मांडव दारी
सासरच्या ओढीनं ही

हसते हळूच गाली
गं पोरी नवरी आली
सनईच्या सुरामंधी
चौघडा बोलतो दारी
गं पोरी नवरी आली

आला नवरदेव भेटीला
गं भेटीला गं
देव नारायण वाटतो
मंडपात गणगोत सारं बैसलं गं
म्होरं ढोल ताशा वाजी रं
हे सासरी मिळू दे तुला
माहेराची माया
हे माहेराच्या माये संग
सुखाची गं छाया
हे भरूनी आला डोळा
जड जीव झाला
हे जड जीव झाला
लेक जाय सासरा
हे किण किण कांकणं
रूणुझुणु पैंजण
सजली नटली नवरी आली
आनंदाच्या सरी तुझ्या
बरसू दे घरीदारी
गं पोरी सुखाच्या सरी
सनईच्या सुरामंधी
चौघडा बोलतो दारी
गं पोरी नवरी आली

आला नवरदेव भेटीला
गं भेटीला गं
देव नारायण वाटतो

मंडपात गणगोत सारं बैसलं गं
म्होरं ढोल ताशा वाजी रं

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*